दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com   lakshamaha.dhule@gmail.com   lakshamaha.nsk@gmail.com   ▶ RNI No.MAHMAR/2019/79184
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित
▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ३४ वा ▶ शनिवार दि. ९ डिसेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे

धुळे - नागपूर, अमरावती, अकोला
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.
2x1 A/C स्लीपर कोच
लगेज व पार्सलची उत्तम व्यवस्था
डेली सर्व्हिस - सांगली, सातारा, कोल्हापूर
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### कारमधून पाच लाखांची रोकड केली लंपास

धुळे । शहरातील गजबजलेल्या महात्मा गांधी पुतळ्यासमोरील कॉर्नरवर कार थांबवुन अज्ञात व्यक्तीने कारमधून पाच लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनगीर (ता. धुळे) येथील आंबेडकर चौकात राहणारे शफीक शेख लुकमान (४३) हे दि.१ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास कार (एमएच १९/सीयू-५४३३)अज्ञात व्यक्तीने कारमधील सिट हॅण्ड ब्रेकजवळ ठेवलेल्या प्लास्टीकच्या पिशवीतील पाच लाख रुपयांची रोकड लंपास केली. याप्रकरणी आझादनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शिरपुरात ११ जुगारींवर पोलिसांची कारवाई

शिरपूर । शहरातील बालाजी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर अग्रसेन पतसंस्थेच्या वरच्या मजल्यावर दीपक सुरेश अग्रवाल हा हस्तकामार्फत असलेल्या जुगार अड्डयावर पोलिसांनी धाड टाकली. या कारवाईत ३ हजार २४० रुपये रोख, ३६ हजार रुपये किमतीचे ८ मोबाईल व जुगाराच्या साहित्यासह ४९ हजार ३७८ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिसांनी दीपक सुरेश अग्रवाल याच्यासह ११ जणांना ताब्यात घेतले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विरोधात अवमानकारक वक्तव्य प्रकरणी
# प्रियांक खर्गे विरोधात धुळ्यात भाजपचे आंदोलन

धुळे । प्रतिनिधी

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र तथा कर्नाटकचे कॅबिनेट मंत्री प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविरोधात अवमानकारक वक्तव्य केल्याने भाजपा आक्रमक झाला आहे. राज्यभरात निषेधाचे सत्र सुरू झाले असून धुळे आणि साक्री येथेही भाजपाने निषेध आंदोलन केले. शहरातील महापालिकेच्या इमारतीसमोरच प्रियांक खर्गेंचा प्रतिकात्मक पुतळा जाळण्यात आला.

यावेळी आंदोलकांनी प्रियांक खर्गे च्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारत जोरदार घोषणाबाजी केली. यात महिला पदाधिकारी आघाडीवर होत्या. त्यानंतर पुतळ्याचे दहन करण्यात आले. आजचे आंदोलन खा. डॉ. सुभाष भामरे, महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजयुमो जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी यांच्या नेतृत्वात करण्यात आले. आंदोलनात धुळे लोकसभा मतदार संघाचे प्रमुख, मा.आ. राजवर्धन कदमबांडे, महापौर प्रतिभा चौधरी, चंदू सोनार, हिरामण गवळी, जयश्री अहिरराव, किरण कुलेवार, भारती माळी, वैशाली शिरसाठ, कल्याणी अंपळकर, जितेंद्र चौवटिया, ओमप्रकाश खंडेलवाल, संजय बोरसे, मुन्ना शितोळे, राजेंद्र खंडेलवाल, पृथ्वीराज पाटील, सुनिल कपिल, अमोल ढापसे. अॅड. किशोर जाधव, रवी मगरे, विनोद खेमणार, पंडितराव मदणे, भागवत चितळकर, विजय पवार, विजय जाधव, भगवान देवरे, गणेश चौधरी, दिनेश बागूल, ईश्वर पाटील, बंटी धात्रक, सुबोध पाटील, भिलेश खेडकर, बबन चौधरी, अरुण पवार, अमोल मासुळे, अनिल थोरात, नरेश गवळी, नरेश हिरे, मोहिणी धात्रक, संगिता राजपुत, वैभवी दुसाणे, नेहा अहिरराव, मिनल अग्रवाल, वंदना विश्वकर्मा, आकाश ढापसे उपस्थित होते.



### पिंपळनेर मंडळातर्फे जोडो मारो आंदोलन

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अपमान केल्याबद्दल भाजपा मंडळ, शहर व युवा मोर्चा पिंपळनेर मंडळातर्फे जोडो मारो आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप कोठावदे, विधानसभा प्रमुख मोहन सूर्यवंशी, लोकसभा विस्तारक रावजी चौरे, मंडळ अध्यक्ष विकी कोकणी, शहराध्यक्ष राजेंद्र पगारे, युवा मोर्चा अध्यक्ष पंकज भावसार, जिल्हा चिटणीस प्रमोद भैया गांगुर्डे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख मोतीलाल पोतदार, मंडळ उपाध्यक्ष शेखर बाविस्कर, सरचिटणीस प्रतीक कोतकर, चिटणीस प्रकाश अहिरराव, कोषाध्यक्ष दिलीप घरटे, मधु तात्या भामरे, राजेंद्र एखंडे, योगेश नेरकर, योगेश बधान, अनिल मुसळे, रवींद्र भावसार, आकाश पगारे, अमोल पाटील, आबा जाधव, किशोर चौधरी, संतोष भामरे, हेमराज दसपुते, रामकृष्ण सोनवणे, संजय भिलाने, बाबा अहिरराव, संजय कोठावदे, हिरालाल कोठावदे, दीपक गांगुर्डे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जोरदार घोषणा

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जुन खर्गे यांचा मुलगाप्रियांक खर्गेने स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबतीत केलेल्या आक्षेपार्ह विधानाचा जोरदार निषेधाच्या घोषणा देऊन व त्यांच्या पुतळ्याला जोडे चपलांचा भडीमार करत त्याच्या पुतळ्याचे भाजपाने दहन केले. हे निषेध आंदोलन भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष आकाश परदेशी यांच्या नेतृत्वात व खा.डॉ. भामरे, भाजपा महानगर अध्यक्ष गजेंद्र अंपळकरांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. देशविरोधी शक्तीची पाठ राखण करणार्या व आतंकवाद रोखण्यास अयशस्वी ठरलेल्या काँग्रेसच्या नेत्यांना खरी देशभक्ती कळलीच नाही. त्यामुळेच काँग्रेसचे नेते अशी विधाने करीत असतात, व देशासाठी प्राणाची आहुती दिलेल्या थोर देशभक्त राष्ट्रपुरुषांविषयी मुक्ताफळे उधळुन अपमान करीत असतात. त्यांच्या वक्तव्याचाआम्ही तीव्र निषेध करीत असल्याची प्रतिक्रीया गजेंद्र अंपळकरांनी दिली.

# शहराच्या विकासकामांसाठी १०३ कोटींची भरीव तरतूद

धुळे । प्रतिनिधी



शहराचे आमदार फारुख शाह यांनी धुळे शहरात चौफेर विकासकामांचा सपाटा सुरु ठेवलेला आहे. 'एकच ध्यास, शहराचा विकास हे ब्रिद घेवून त्यांनी पहिल्या दिवसापासून स्वत:ला शहर विकासासाठी झोकून दिले आहे. त्यांच्या प्रयत्नातून शहरात नजरेत भरणारी विकासकामे होत असल्याने धुळेकरही त्यांच्यावर खुश आहेत. आता हिवाळी अधिवेशनात पुरवणी अर्थसंकल्पात शहरातील विकासकामांसाठी तब्बल १०३ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. यासाठी आ.शाह यांनी विशेष प्रयत्न चालविले होते. या निधीमुळे शहर विकासाला मोठा हातभार लागणार आहे.

आ.फारुख शाह यांनी धुळे शहरात विविध भागांमध्ये रस्ते तयार करुन नागरिकांची गैरसोय दुर केली आहे. तसेच साक्रीरोडसह मोतीनाल्यावरील पुलाचे रुंदीकरणाचे काम मार्गी लावले, कमलाबाई कन्याशाळेजवळील पादचारी पुल उभारला, स्वा.सावरकर स्मारकाच्या दुरुस्तीसाठी तसेच स्मशानभुमीत गॅस व विद्युतदाहिनीसाठी निधी उपलब्ध करुन दिला. आरटीओ कार्यालयाची इमारत, शहरात मध्यवर्ती ठिकाणी शासकीय इमारत इ.साठी त्यांनी पाठपुरावा केला. याशिवाय शासनाकडे पाठपुरावा करुन विविध विकासकामांसाठी आतापर्यंत शेकडो कोटींचा निधी त्यांनी खेचून आणला आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे धुळेकरांमधून समाधान व्यक्त होत आहे. अधिवेशनात शहरासाठी सध्या नागपूर येथ या अर्थसंकल्पात धुळे शहर मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी १०३ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे.

# नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्या राहणार बेमुदत बंद

नाशिक । प्रतिनिधी

केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. स्थानिक बाजारपेठांतील कांद्याचे दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारनं निर्यात बंदी करण्याचा निर्णय घेतलाय. ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातबंदी राहणार असल्याचे परिपत्रक सरकारकडून काढण्यात आलं आहे. या निर्णयाच्या विरोधात नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्या बेमुदत बंद राहणार आहेत. चांदवड येथील कांदा व्यापाऱ्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

निर्यातबंदीची सूचना किमान आठ दिवस अगोदर देणे गरजेचे होते. मात्र केंद्र शासनाने घेतलेला निर्णय शेतकरी, व्यापारी यांच्या मुळावर असल्याचे व्यापाऱ्यांनी म्हटलं आहे. जोपर्यंत कांद्यावरील निर्यातबंदी उठवली जात नाही, व्यवहार सुरळीत होत नाही, तोपर्यंत कांदा लिलाव बंद ठेवण्याचा निर्णय व्यापाऱ्यांनी घेतला आहे. चांदवड येथील व्यापारी बैठकीत एकमुखाने निर्णय घेतला आहे.



केंद्र शासनाकडून ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे. कांद्याच्या वाढत्या भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र शासनाने निर्यात बंदीचा घेतला निर्णय घेतला आहे. या निर्णयावर शेतकरी आणि कांदा व्यापाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारच्या या निर्णयानंतर लासलगाव, मनमाड, नांदगावसह बहुतांश बाजार समित्यात कांद्याचे लिलाव बंद आहेत. नाशिकच्या उमराणे येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मुंबई - आग्रा महामार्ग रोखला आहे. दिल्लीतील बाजारात स्थानिक विक्रेते ७० ते ८० रुपये किलो दरानं कांद्याची विक्री करत आहेत. मात्र, आता निर्यातबंदी केल्यानं दरात घसरण होण्याची शक्यता आहे.

# विनापरवान्याचे ८ लाखांचे मद्य जप्त

धुळे । प्रतिनिधी

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील हाडाखेड सीमा तपासणी नाक्यावर सेंधव्याहून (मध्य प्रदेश) विनापरवाना, शासनाचा कर बडवून विक्रीसाठी येणारे ८ लाखांचे विदेशी मद्य व १५ लाखांचे वाहन असा २३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी बुधवारी रात्री ही कारवाई केली. हे विदेशी मद्य फक्त चंदीगड राज्यात विक्रीला परवानगी होती. ते महाराष्ट्रात कर चुकवून आणले जात होते.

सेंधव्याहून हाडाखेडकडे येणाऱ्या आयशरमधून एनएल ०१ एसी २८७६ मद्याची चोरटी वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरेश शिरसाट यांनी पथकासह हाडाखेड चेकपोस्ट जवळ सापळा रचला. पोलिस दिसताच वाहन चालक आशयर सोडून पसार झाला. आयशरमध्ये एक मोबाइल आढळला. ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलिस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरेश शिरसाठ, सुनील बसावे, मंगला पवार, संदीप ठाकरे, कृष्णा पावरा, संतोष पाटील, इसरार फारुकी यांनी केली.

# विनापरवाना गुंगीकारक औषधे बाळगणाऱ्या महिलेविरुध्द एलसीबीची धडक कारवाई

धुळे । प्रतिनिधी

धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, फहिदा ऊर्फ मीना उस्मान शेख राहणार अमन मेडिकल जवळ, जामचा मळा, चाळीसगांव रोड, धुळे हिच्याकडे विनापरवाना गुंगीकारक औषधे विक्रीकरीता बाळगले आहेत.

त्या अनुषंगाने नमुद ठिकाणी पोलीस निरीक्षक शिंदे स्थानिक गुन्हें शाखा, धुळे हे स्टाफसह मिळालेल्या बातमी ठिकाणी पोहोचले असता फहिदा ऊर्फ मीना उस्मान शेख यांचे घराची झडती घेतली घेतली असता नमूद संशयिताच्या घरामध्ये 'क्लोरफेनिरामाईन म्यॅलिएट अँड कोडीन फॉस्फेट रेक्स ओ रेक्स कफ सिरप' या नावाच्या १८ बॉटल मिळून आल्या. त्याची प्रत्येकी किंमत १५१ रुपये ८० पैसे इतकी असून त्याची एकुण किंमत २ हजार ७३२ रुपये ४० पै सेआहे. तीच्याकडे गुंगीकारक औषधे बाळगण्याचा अगर विकण्याचा कुठलाही परवाना नसतांना तसेच डॉक्टरांच्या विना प्रिस्क्रीप्शन शिवाय बाळगणे म्हणून योग्य ती कार्यवाही करून सादर गुंगीकारक औआषाढाचा बाटल्या जप्त करून तिला ताब्यात घेण्यात आलं. ही कारवाई ही पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, एपीआय संदिप पाटील, पीएसआय विनोद पवार, अमरजित मोरे, एएसआय दिलीप खोंडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल मच्छिंद्र पाटील, पोलीस नाईक शशिकांत देवरे, सागर शिर्के, जितेंद्र वाघ, हर्षल चौधरी, व अविनाश वाघ,पोलीस कॉन्स्टेबल सारंग शिंदे व महिला माधुरी हटकर यांनी केली.

# बुराई नदी पात्रातुन होणारा अवैद्य वाळू उपसा थांबवा

### कारवाई होत नसल्याने ग्रामस्थ आक्रमक

चिमठाणे । प्रमोद शिंपी



निशाणे व म्हाळपुर येथील बुराई नदी पात्रातून होणारा अवैद्य उपसा काही दिवसच बंद होता.परंतु पुन्हा हा वाळू उपसा सुरु झाल्याने नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. महसूल विभागाने सूचना देत हा वाळू उपसा थांबण्यात यावा अशी मागणी नागरिक करीत आहे.

नदीच्या पात्रात वाळूतस्करांकडून दिवसाढवळ्या दरोडे टाकले जात आहेत. प्रशासनाकडून बघ्याची भूमिका घेतली जात असल्याने गावे वाळूमाफियांच्या दहशतीखाली वावरत आहेत. बेसुमार वाळू उपशामुळे नदीपात्रात ४० फुटांपर्यंत खोल खड्डे झाले असून गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे. दिवसाही वाळूचोरीला कुणाचीच हरकत नसल्याचा आत्मविश्र्वास असल्याने गिरणेच्या पात्रात दिवसा वाळूचोरी सुरू झाली आहे. वाळू उपसा बंद करण्यात यावे अशी मागणी जतन नगराळे, तगदीर भिल, हिलाल भिल, दाजू भिल, राजेंद्र भिल, गणेश भिल, नानाभाऊ मालचे, बापू भिल, संतोष भिल, कविता नगराळे, जण्याबाई भिल, लताबाई पाटोले, इंदुबाई भिल, जिजाबाई भिल, सायंकाबाई भिल, गजाबाई भिल, ललिताबाई भिल, अंजनाबाई भिल आदी केली आहे.

# आयशर वाहनाची विद्युत पोलला धडक

धुळे । पारोळ्याहून धुळे शहरात येणार्या आयशर वाहनाला अपघात झाल्याची घटना काल पहाटे ५ वाजेच्या सुमारास घडली. सदर वाहन पांझरापोळ समोरील दुभाजकवर चढून विद्युत पोलला धडकले. यामुळे दोन विद्युत पोल वाकून वीज तारा रस्त्यावर आल्या. या अपघातामुळे पांझरा पोळ भागात वीज पुरवठा ठप्प झाला असून वीज कंपनीने सकाळपासूनच युध्दपातळीवर काम सुरु केले आहे. पारोळ्याहून धुळ्याकडे येणारे आयशर (एमएच १८/बीजी १३८९) वाहन धुळ्यात आले असता पांझरापोळ जवळ दुभाजकावर चढून त्याचा अपघात झाला.

# दत्तक घेतलेले नरव्हाळ गाव स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविण्याचा संकल्प : प्रांतपाल मिहीर दवे

### रोटरी क्लबच्या कार्याची पत्रपरिषदेत दिली माहिती

धुळे । प्रतिनिधी




रोटरी क्लबच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. शासनासह समाजातील विविध घटकांच्या माध्यमातून आलेल्या मागणीनुसार रोटरी क्लब विविध साधनांच्या रूपाने गरजूंपर्यंत सेवा व मदत देण्याच्या कामात रोटरी क्लब ही स्वयंसेवी संस्था सातत्याने पुढाकार घेवीं काम करीत असल्याची माहिती रोटरी क्लब ३०६० चे प्रांतपाल मिहीर दवे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. दवे पुढे म्हणाले की, १ जुलै ते ३० जून या माझ्या कार्यकाळात समाजात कोणकोणत्या मुद्द्यांवर काम करावे याचे संपूर्ण नियोजन करून वेगवेगळ्या स्कीम्स राबविण्याचा प्रयत्न होत आहे. आज २० हॉकर्सना व्यवसायाकरिता मोठ्या व्यावसायिक छत्री भेट देण्यात आल्या. आगामी काळात संपूर्ण शहरात ५०० छत्र्या उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. गरजू रुग्णांच्या डायबेटिज तपासणी करण्यात आल्या. रोटरी क्लबच्या धुळे युनिटने तालुक्यातील नरव्हाळ हे गाव दत्तक घेतले असून गावात विविध सोयीसुविधा उपलब्ध करून गाव स्वावलंबी बनविण्याचा संकल्प आहे.रोटरीच्या विविध प्लॅटफॉर्म्सबद्दल व विंग्सबद्दल सविस्तर माहिती मिहीर दवे यांनी दिली. पत्रकार परिषदेला रोटरी क्लबच्या फर्स्ट लेडी वैशाली दवे, अध्यक्ष दीपक जैन, सेक्रेटरी विलास कोठावदे, माजी अध्यक्ष राजेश वाणी, आशुतोष जोशी, पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# ग्रामसेवक गावात राहत नाहीत, तुम्हीच सांगा विकास साधणार कसा?

ग्रामसेवक हा गाव आणि सरपंच यामधील विकासात्मक दुवा समजला जातो. धुळे पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये एकही ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसून धुळे शहरात आणि लांब पल्ल्याच्या ठिकाणाहून 'अपडाऊन' करतात. त्यामुळे गावविकासाला 'खीळ' बसेल हे सहजच आहे. बरेचशे ग्रामसेवक शंभर ते दीडशे किलोमीटरचा प्रवास करीत असतात. त्यामुळे तुम्हीच सांगा गावाचा विकास कसा साधणार? असा सवाल पुढे आला आहे.

जिल्हा परिषदेमार्फत राज्यशासनाच्या व केंद्रशासनाच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. कल्याणकारी शासन म्हणून या सेवा ग्रामीण भागातील जनतेला सर्वकाळ उपलब्ध होतील, असे शासनाकडून पाहिले जाते. यासाठी जिल्हा परिषदेमार्फत नियुक्त केल्या जाणाऱ्या ग्रामसेवकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केले आहे. मात्र, मुख्यालयी राहत असल्याचे खोटे दाखले सादर करीत असतात. गावपातळीवर ग्रामसेवकांना गावाचा सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने मुख्यालयी राहणे बंधनकारक असल्याचा ग्रामविकास विभागाने धोरणात्मक निर्णय देखील घेतला आहे. मात्र, सदर निर्णयाची पायमल्ली होताना दिसून येत आहे. याकडे वरिष्ठांचा असलेला दुर्लक्षपणा कारणीभूत असल्याचे एकंदरीत चित्र आहे. अनेक ग्रामपंचायतीचा डोलारा असल्याने स्वतंत्र दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आदी दिवशी ध्वजारोहणाचा कार्यक्रमाला अनुपस्थिती असते. बरेचदा ग्रामसभा आणि मासिक सभेला देखील ग्रामसेवक हजर राहत नाही. ग्रामसेवक हा प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी अत्यंत महत्वाचा माणूस, परंतू तालुक्यातील अनेक ठिकाणी चार-चार पाच-पाच गावांना मिळून एक ग्रामसेवक आहेत. अशात ह्या ग्रामसेवक मंडळींकडून कुठल्याही एका गावावर योग्य प्रकारे लक्ष केंद्रीत होताना किंवा सहकार्य होताना दिसत नाही. आज मी ह्या गावात आहे तुम्हाला उद्या भेटतो, उद्या मी पंचायत समितीला आहे, तुम्हाला परवा भेटतो, अशी कारणे सांगणे ह्यामुळे ग्रामसेवक मंडळींना सोपे जाते.



### गावातील कोणता वॉर्ड कुठे आहे?

गावातील कोणता वॉर्ड कुठे आहे? याची साधी माहिती देखील त्यांच्याकडे नसते. गावात कोणत्या समस्या आहेत, कोणती कामे करायची आहेत याची साधी कल्पना नसते कारण गावात कधी फिरकूनही पाहत नाहीत. गाव म्हटले की समस्यांचा जणू पाढाच असतो. या महिन्यात झालेल्या कोदामेंढीच्या मासिक सभेत चक्क ग्रामसेवक हजर नव्हते. असे प्रकार बऱ्याच ठिकाणी घडत असतात. काही ग्रामपंचायतीमध्ये महिना महिना ग्रामसेवकांचे तोंड पाहिले नसल्याचे गावकरी सांगतात. त्यातच सर्वच ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी 'अप डाऊन' करीत असतात. मुख्यालयी कुणीही राहत नसून अशी एकंदरीत विदारकता असल्याने आता तुम्हीच सांगा गावाचा विकास कसा साधणार?

शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

# कांदा निर्यात बंदीविरोधात शेतकरी आक्रमक; येवल्यामध्ये रास्ता रोको

येवला । प्रतिनिधी

केंद्र सरकारने नुकतीच निर्यात बंदी जाहीर करण्यात आली असून मनमाड नगर महामार्गावर शेतकरी पदाधिकारी यांनी रास्ता रोको केला असून बाजार समिती समोर शेतकऱ्यांनी आंदोलन केले.

आधीच अवकाळी व गारपिटीमुळे लाल कांद्याचे नुकसान झाले आहे, त्यातच शेतकऱ्यांकडे कांदा शिल्लक नाही नसून त्या कांद्यात थोडाफार भाव मिळत असल्याने केंद्र सरकारने शहरी लोकांचा विचार करत तातडीने निर्यात बंदी लादली. मात्र यामुळे चार हजार रुपये विकणारा कांदा अचानक २००० पेक्षाही खाली विकायला सुरुवात झाली त्यात कृषी उत्पन्न बाजार समिती देखील आता लिलाव बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांचा संताप झाल्याचे पहायला मिळत आहे. शेतकऱ्यांच्या भावना तीव्र असल्याने राज्यशासनाने तातडीने पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे. याबाबत विधानसभेतही पडसाद उमटले असून शेतकऱ्यांच्या भावना तीव्र असून राज्य सरकारने केंद्र सरकारकडे तातडीने निर्यात बंदी उठवण्याची मागणी करावी. सध्या शेतकरी संघटना व शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत.

## केवळ कबुली पुरेशी?

रस्ते अपघात घडला की सामान्यतः चालकाला जबाबदार ठरवले जाते. क्वचित बघे मारहाण देखील करताना आढळतात. तथापि सगळेच अपघात चालकाच्या चुकीमुळेच होतात असे नाही तर खराब रस्ते आणि सदोष रोड इंजिनियरिंग हे देखील अपघातांचे एक प्रमुख कारण असल्याची मनमोकळी कबुली रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एका जाहीर कार्यक्रमात बोलताना दिली.

रोड इंजिनिअरिंग म्हणजे रस्त्यांची रचना, गुणवत्ता आणि देखभाल. दरवर्षी सुमारे पाच लाखांपेक्षा जास्त अपघात होतात. त्यात दीड लाखांपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू होतो. तीन लाख लोक जखमी होतात. दोन्ही प्रकरणामध्ये तरुण लोकांचे प्रमाण जास्त आहे. देशाच्या भविष्याचा असा मृत्यू होणे क्लेशदायक आहे, अपघातात त्यांचीही चार हाडे मोडली होती असेही गडकरी म्हणाले. गडकरी यांनी गंभीर समस्येकडे लक्ष वेधले आहे. रस्ते अपघात गंभीर आहेतच पण त्यात युवांचा मृत्यू होणे त्याहूनही जास्त गंभीर आहे. रस्त्याचे सदोष रोड इंजिनिअरिंग नाशिककरांच्याही परिचयाचे आहे. पावसाळ्यात उड्डाण पुलावर साचणारे पाणी, पुलावरुन खाली वाहाणारे छोटे धबधबे, शहरात ठिकठिकाणी साचणारे पाणी आणि खड्यात गेलेले रस्ते ही त्याची काही उदाहरणे. स्मार्ट सिटीने बांधलेल्या सीबीएस ते अशोकस्तंभ या रस्त्यावरून जाताना वाहनचालक आणि त्यांच्या मागे बसलेल्या लोकांना उंटावर बसल्याचा भास होतो अशी भावना व्यक्त होताना आढळते. पण सदोष बांधकाम हा लोकांचा दोष नाही. तरीही त्याची शिक्षा मात्र तेच भोगतात.

अनेक कुटुंबे त्यांच्या घरातील कर्ती व्यक्ती गमावतात. कायमचे दुःख पदराला बांधून घेतात. रस्ते अपघातात येणारे दुर्धर अपंगत्व म्हणजे रोजचेच मरण नाही का? सरकारी नाकर्तेपणाचे परिणाम वाहनचालकांनी का भोगावेत? देशात लाखो कोटी रुपयांचे हजारो किलोमीटरचे रस्ते बांधले जातात. जायलाही हवेत. रस्ते विकासाचा मार्ग प्रशस्त करतात. समृद्धी महामार्गाची लोकांना प्रतीक्षा होती. तो वापरण्यासाठी खुला झाला तेव्हा एकदा तरी त्यावरून वाहन चालवण्याची इच्छा अनेक वाहनचालकांनी माध्यमांकडे व्यक्त केली होती. तथापि तो मार्ग अपघातांमुळेच जास्त चर्चेत राहिला. अनेक महामार्ग मृत्यूचे सापळे का बनतात? महामार्गांची दुरवस्था ही वेगळीच समस्या आहे. रस्ते अपघातमुक्त असावेत ही अपेक्षा गैर म्हणता येईल का? केंद्रातील कार्यक्षम मंत्री म्हणून गडकरी ओळखले जातात. सडेतोड आणि मनमोकळे बोलण्यासाठी देखील ते प्रसिद्ध आहेत.

स्वतःच्याच खात्याच्या अकार्यक्षमतेची कबुली कोणत्या खात्याचे मंत्री देतात? गडकरींनी मात्र ती दिली आहे. तथापि नुसती कबुली पुरेशी ठरेल का? त्यामुळे अपघात कमी होणे शक्य होऊ शकेल का? कदाचित गडकरी यांनाही त्याची कल्पना असावी. रोड इंजिनियरिंगची कठोर अंमलबजावणी हे सरकारचे प्रमुख कर्तव्य आहे. रस्ते बांधणी, त्याची गुणवत्ता आणि देखभाल सरकारनेच करायला हवी. गडकरी या उणीवा दूर करतील अशी लोकांना आशा आहे. अर्थात त्यांनी कबुली दिली म्हणून वाहनचालकांच्या बेदरकारपणाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अती वेगाची नशा आणि नियमांना हरताळ फासणे जणू काही फॅशनच झाली आहे. सदोष रोड इंजिनियरिंगमध्ये मानवी चुका अपघातांचे प्रमाण वाढवतात. बळींच्या संख्येत भर घालू शकतात. हे वाहनचालकांना विसरून चालणार नाही. सावधानता आणि नियमांचे पालन याला पर्याय नाही याची खूणगाठ वाहनचालकांनी मनाशी बांधलेली बरी.

# भ्रष्टाचार हा देशाच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा

**(आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन विशेष)**

भ्रष्टाचार हा समाजाचा एक विळखा आहे जो समृद्ध समाजाच्या विकासात सर्वात मोठा अडथळा बनतो. लोभ, लाचारी किंवा बळजबरीमुळे लोक भ्रष्टाचाराला विरोध करण्याऐवजी सतत प्रोत्साहन देतात, ज्यामुळे अनेकदा न्याय आणि मानवतेचा पराभव होतो. ज्यांना फायदा होतो ते आपल्या पदाचा, सत्तेचा आणि प्रतिष्ठेचा गैरवापर करून सरकार आणि जनतेची लूट करतात. आपल्याला अनेकदा कुठे ना कुठे भ्रष्टाचाराला सामोरे जावे लागते, बरेच लोक कष्ट करतात आणि ते धडपडत राहतात आणि यश दुसरा कोणीतरी घेतो. बऱ्याच वेळा प्रत्येक क्षेत्राशी, प्रत्येक विभागाशी निगडित असलेल्या कर्मचाऱ्याला माहित असते की त्याच्या कडे भ्रष्टाचार कुठे फोफावतो किंवा कुठे चुकीच्या कामांना प्रोत्साहन दिले जाते, पण उघडपणे कोणी विरोध करत नाही, प्रत्येकजण आंधळेपणाचे नाटक करून पाहत राहतो कारण त्यांना काही समस्या होत नाही किंवा आपण का विरोध करायचा असा विचार करतात. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी अनेक कडक कायदे आहेत, सरकारी यंत्रणा काम करत आहेत, अनेक संस्था, सामाजिक कार्यकर्तेही भ्रष्टाचाराविरुद्ध काम करत आहेत, तरीही भ्रष्टाचार झपाट्याने पसरत आहे. भ्रष्टाचाराने ग्रासलेल्या लोकांच्या जीवन संघर्षाला आत्यंतिक संघर्षाला सामोरे जावे लागते. भ्रष्टाचारामुळे विश्वास नष्ट होऊन लोकशाही कमकुवत होते. आर्थिक वाढीस अडथळा आणून, ते असमानता, गरिबी, सामाजिक विभाजन आणि पर्यावरणीय संकट वाढवते.

ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल द्वारे केलेल्या करप्शन परसेप्शन इंडेक्स २०२२ च्या अहवालानुसार, भारत ४० गुणांसह १८० देशांपैकी ८५ वा सर्वात कमी भ्रष्ट देश बनला आहे. ८९% लोकांचा असा विश्वास आहे की सरकारी भ्रष्टाचार ही एक मोठी समस्या आहे. ३९% सार्वजनिक सेवा वापरकर्त्यांनी गेल्या १२ महिन्यांत लाच दिली आहे. सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेल्या देशांमध्ये भ्रष्टाचार हा अनेकदा मजबूत असतो. दुर्दैवाने, दरडोई उत्पन्न कमी असलेल्यांपैकी भारत एक आहे. जागतिक बँकेने २००४ मध्ये सांगितले की लाचखोरीमुळे दरवर्षी जगभरात १ ट्रिलियन यूएस डॉलरचे नुकसान होत होते. जागतिक स्तरावर, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा अंदाज आहे की भ्रष्टाचाराची किंमत दरवर्षी अंदाजे २.६ ट्रिलियन यूएस डॉलर म्हणजेच रु. २,१६,३७,२०० कोटी रुपये आहे. राजकारणी, सरकारी अधिकारी, लोकसेवक, व्यापारी किंवा जनतेचे सदस्य, असे कोणीही भ्रष्टाचारात सहभागी असू शकतात. व्यवसाय, सरकार, न्यायालये, प्रसारमाध्यमे, आरोग्य, शिक्षणापासून पायाभूत सुविधा, क्रीडा व इतर सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार कुठेही होऊ शकतो. राजकारणी लोकांच्या पैशाचा गैरवापर करून सार्वजनिक नोकऱ्या किंवा कंत्राटे त्यांचे नातेवाईक, मित्र आणि कुटुंबीयांना देऊ शकतात आणि त्यांना हवे ते काम मिळवून देण्यासाठी अधिकाऱ्यांना लाच देऊ शकतात.



डॉ. प्रितम भी. गेडाम
मो.०८२३७४ १७०४१

इंडिया करप्शन सर्व्हे २०१९ नुसार, ५१% प्रतिसादकर्त्यांनी लाच दिल्याचे मान्य केले.

भारतात भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी काही महत्त्वाच्या कायदेशीर आणि नियामक चौकटी तयार करण्यात आल्या आहेत. जसे की:- भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८, सार्वजनिक सेवकांच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात आणि भ्रष्टाचाराच्या कृत्याला प्रोत्साहन देण्यात सहभागी असलेल्यांना शिक्षेची तरतूद आहे. २०१८ च्या दुरुस्तीने सार्वजनिक सेवकांकडून लाच घेणे तसेच कोणत्याही व्यक्तीने लाच देणे या दोन्ही व्यक्तींना गुन्हेगार ठरवले आहे. प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग कायदा २००२, भारतातील मनी लाँडरिंग आणि 'गुन्ह्यातील उत्पन्नाचा' वापर रोखण्याचे उद्दिष्ट आहे. कंपनी कायदा २०१३ कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि फसवणूक रोखण्यासाठी तरतूद करतो. 'फसवणूक' या शब्दाची विस्तृत व्याख्या देण्यात आली आहे आणि कंपनी कायद्यानुसार हा गुन्हा आहे. भारतीय दंड संहिता १८६०, लाचखोरी आणि फसवणुकीच्या प्रकरणांना कव्हर करण्यासाठी अर्थ लावता येईल अशा तरतुदी सेट करते, ज्यामध्ये गुन्हेगारी विश्वासभंग आणि फसवणुकीशी संबंधित गुन्ह्यांचाही समावेश आहे. बेनामी व्यवहार (निषेध) कायदा १९८८, हा कायदा एखाद्या व्यक्तीने ज्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर मालमत्ता घेतली आहे त्याला ती स्वतःची म्हणून दावा करण्यापासून प्रतिबंधित करते.

भ्रष्टाचाराचा परिणाम समाजातील सर्वात असुरक्षित लोकांवर होतो. जे राष्ट्र भ्रष्टाचाराशी लढा देतात आणि त्यांच्या कायद्यात सुधारणा करतात ते त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न ४०० टक्क्यांपर्यंत वाढवू शकतात. लोकांची जागृतीच भ्रष्ट व्यवस्था बदलू शकते. भ्रष्टाचाराविरुद्ध लढा आणि प्रामाणिकपणा, पारदर्शकता, कर्तव्यनिष्ठा या प्रत्येकाच्या जीवनाचा, समाजाचा, संस्कृतीचा भाग बनवा. आपल्या सिस्टममध्ये सतत तपासणी आणि समतोल राखला पाहिजे. कर्मचारी किंवा लोकप्रतिनिधी जितका उच्च पदावर असेल तितका तो जनतेला जबाबदार असतो, हे सामान्य माणसाने कधीही विसरू नये. शासनात जबाबदार व्यक्तीला प्रश्न विचारणे कायद्यांतर्गत प्रत्येकाचा हक्क आहे. भ्रष्टाचार संबंधित तक्रारींसाठी भारत सरकारच्या केंद्रीय दक्षता आयोगाशी संपर्क साधण्यासाठी, तुम्ही टोल फ्री १८००११०१८०, १९६४ कॉल करू शकता. यासोबतच राज्य सरकारचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागही या समस्येशी लढण्यासाठी सदैव तत्पर आहेत. महाराष्ट्र राज्य लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधण्यासाठी +९१ २२-२४९-२१२१२, टोल फ्री क्रमांक १०६४, व्हाट्सएप क्रमांक ९९३०९९७७००, ईमेल आयडी acbwebmailmahapolice.gov.in वापरू शकता. भ्रष्टाचार हा पदाचा, समाजाचा, देशाचा सर्वात मोठा विश्वासघात आणि देशद्रोह आहे. सदैव जागृत राहा, सतर्क राहा आणि देशहितासाठी काम करा.

# भ्रष्टाचार विरोधी चळवळ व्यापक व्हावी

## ९ डिसेंबर आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भ्रष्टाचार मुक्त भारत बनवायचा आहे ते त्यांचे स्वप्न आहे. त्यामुळे त्यांनी त्यांची भूमिका याआधी जाहीर केली आहे ना खाऊंगा ना खाने दूंगा. अर्थात भ्रष्टाचार करणार नाही आणि करुही देणार नाही. परंतु ना खाने दूंगा म्हणजे भ्रष्टाचार करू देणार नाही हा भाग मात्र जवळपास जैसे थे आहे. आज आपण जर वर्तमानपत्र उघडले तर जशा शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या बातम्या वाचायला मिळतात तसेच पानोपानी भ्रष्टाचाराच्या अनेक बातम्या वाचायला मिळतात. अर्थातच हा भ्रष्टाचार अनेक प्रकारांचा असतो तो अगदी खाली तलाठ्यापासून तर उच्च प्रशासकीय अधिकार्यापर्यंत असतो, आमदार, खासदार, राजकीय पदाधिकारी, आता त्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद हे सर्व कार्यालय येतात. कितीही म्हटले तरी तो यामधील भ्रष्टाचार अद्याप पर्यंत थोपवता आलेला नाही. त्याचीही अनेक करणे आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मनात जरी भ्रष्टाचार मुक्त भारत ही संकल्पना असली तरीपण आज आपण बघत आहोत, तसे वातावरण नाही. ज्या त्या क्षेत्रात भ्रष्टाचार माजलेला आहे. अगदी गाव पातळीपासून भ्रष्टाचाराची मूळ आहेत आणि वरती तर मग त्याचा वृक्ष झालेला आहे .आज मितीला जर बघितले तर सहकार खाते, सार्वजनिक बांधकाम,परिवहन, अन्न पुरवठा, महसूल,कृषी, गृह, उर्जा, वन, ग्राम विकास, आदिवासी विकास, ग्राहक विभाग , शिक्षण विभाग,सर्व खाते भ्रष्टाचाराचे कुरणे आहेत. पंतप्रधानांनी कठोर पावले उचलण्याचा निर्धार केलेला आहे. पण भ्रष्टाचाराची प्रकरणे वाढताना दिसत आहेत. अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येतात. त्यात मोठे प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. तो थोपवण्याचे आव्हान आहे. सातबारा उतारावरील पक्की नोंद करण्यासाठी पैशाची मागणी केली जाते, शेतात वीज कनेक्शन घेताना पैशाची मागणी केली जाते, जिल्हा परिषद मधून शिक्षण विभागातून पगार काढण्यासाठी पैशाची मागणी केली जाते, वनविभागात वृक्ष लागवडीमध्ये भ्रष्टाचार होतो, सरकारी धान्य गोडाऊन मधून माल बाहेर विकला जातो. शेतकऱ्याला शेडनेट मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात, तसेच बऱ्याच वेळा निरनिराळे कर्ज मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात.

मंत्रालयापासून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयापर्यंत कुठेही सर्वसामान्य माणसाचे काम सहजरीत्या होत नाहीत. ही साखळी अनेक वर्षांपासून तशीच आहे. लाखाच्यावर पगार असणाऱ्या शासकीय सेवेतील कर्मचारी लाच घेताना कचरत नाही आणि त्यांनाही काही वाटत नाही. लाखाच्या वर पगार घेणारा कर्मचारी शेतकऱ्याकडून सुद्धा पैशाची मागणी करतो,आणि घेतो, ही अतिशय शरमेची गोष्ट आहे. या सगळ्या गोष्टींना कुठेतरी लगाम घालणे आवश्यक आहे. भूमी अभिलेख कार्यालयात अनेक दलालांचा वावर असतो. नाव लावण्यासाठी या ठिकाणी दर ठरलेले आहेत आणि यातील वाटा साहेबांना द्यावा लागतो असे सांगून दलाला कडून सर्वसामान्यांची लूट करण्यात येते. अलीकडेच पुण्यास ट्रस्टच्या जागेचे एन.ए. प्रस्ताव मंजूर करण्यासाठी ४२ लाख लाच मागीतली.तहसीलदार महसूल सहाय्यक, तलाठी आणि खाजगी व्यक्ती अशा पाच जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. मनरेगा अंतर्गत गोठा, सिंचन, विहिरी तसेच इतर योजनांच्या फाइल्स २५% रक्कम घेतल्याशिवाय पुढे सरकत नाहीत. यामध्ये कर्मचारी अधिकारी नेत्यापर्यंतची साखळी असल्याचा स्फोट ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांनी जळगावच्या बैठकीत केला होता . जर असेच सुरू राहिले तर पंतप्रधानांचे भ्रष्टाचार मुक्त भारताचे स्वप्न कसे पूर्ण होईल ? असेही म्हटले होते. बोगस बी बियाण्यामुळे शेतकऱ्यांना खूप मोठा फटका बसतो परंतु कंपन्यांवर कडक कारवाई होत नसल्यामुळे आणि त्यातही भ्रष्टाचार असल्यामुळे ते शक्य होत नाही .जालना जिल्ह्यातील परतुर येथील उपविभागीय कृषी अधिकारी यांना एक लाख रुपयाची लाच घेताना रंग हात पकडले. कृषी संजीवनी योजनेतून घेतलेल्या शेडनेटचे बिल काढण्यासाठी पैशाची मागणी केली होती.



दिलीप देशपांडे
जामनेर. जि.जळगांव.
मो.८९९९५६६९१७

तर भूसंपादन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवण्यासाठी लाच स्वीकारतांना उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात आली.पुणे, नासिक, येथेही अलीकडच्या काळात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भ्रष्टाचाराची मोठी प्रकरणे निघाली. नाशिकला तर महसूल सप्ताहातच तहसीलदार पंधरा लाख रुपयाची लाच घेताना पकडला गेला. तर पुण्यामध्ये महानगरपालिकेत निवृत्त झालेल्यांना दहा हजार रुपये पासून ते एक लाख रुपये पर्यंतचे मागणी (लाच )पेन्शन सुरू होण्यासाठी केली जाते. मुंबईत आय आर एस अधिकारी इडी कडून ताब्यात घेतला जातो, असे एक ना अनेक भ्रष्टाचारी प्रकरणे आपल्याला पाहायला मिळतात.किती सांगावी,पानेची पानं भरतील. लाच लुचपत विभागामार्फत सापळे रचले जातात भ्रष्टाचारींना पकडण्यात येते परंतु त्याचे पुढे काय होते ? हे मात्र समजत नसते. ते प्रश्न अनुत्तरीतच राहतात. त्या दृष्टीने अशा केलेल्या कार्यवाहीचा आणि कारवाईचा अहवाल वेळोवेळी प्रसिद्ध व्हायला हवा जेणेकरून जनतेमध्ये जागृती निर्माण होईल. भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांना सामील करून घेण्याच्या गरजेवर पंतप्रधानांनी भर दिला आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी किती शक्तिशाली असला तरी त्यांना वाचवायचे नाही ही जबाबदारी अनेक संस्थांची आहे तसेच त्या व्यक्तीला राजकीय, सामाजिक पाठबळ मिळायला नको. अशा वातावरण निर्मितीची गरज आहे.

एका कार्यक्रमात नाना पाटेकर यांनी मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला होता, मंत्री तर जाऊ द्या,पण साधा आपला नगरसेवक यावर्षी निवडून आला की पुढच्या वर्षी मालामाल होतो.कोट्याधीश होतो. मला कळतं सगळ्यांनाच कळत, तुम्हालाही कळत, पण आपण बोलत नाही. त्याची चौकशी व्हायला नको का ? एकनाथराव ? आपण का बोलत नाही ? परंतु त्याचे उत्तर मुख्यमंत्रीनी न देता,देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आपण म्हणतात ते बरोबर आहे. पण परिस्थितीच अशी आहे की आज भ्रष्टाचाराच्या आरोपातून बाहेर आलेल्या,अनेक चौकशात,घोटाळ्यात अडकलेल्या लोकांची पसंती असते. तो मोठ्या मताने निवडून येतो आमचा नाईलाज असतो. जनतेने खरं खोटं चांगलं वाईट हे ओळखायला पाहिजे त्याची गरज आहे. परंतु हे उत्तर ना नाना पाटेकर यांनी ऐकून घेतले त्यावर नंतर चर्चा केली नाही. परंतु फडणीसांची हे उत्तर फारसे संयुक्तिक वाटत नाही. आजची परिस्थिती आपण बघितली का राष्ट्रीय पक्षांना कुठली तत्व राहिले नाही अनेक भ्रष्टाचाराची आरोप असताना त्यांना सत्ताधारी पक्ष जवळ करतो मग हे कसे साध्य होणार? आपण स्वतः इतके स्वच्छ असताना मग अशा भ्रष्ट लोकांना का सामावून घेतात ? मग भ्रष्टाचार मुक्त भारत हे स्वप्न पंतप्रधान उराशी बाळगून आहेत ते कसे पूर्ण होणार. सरकार कोणाची असो पक्ष कोणताही असो पण अशा लोकांना राजकारणापासून त्यांची जागा त्यांना दाखवली पाहिजे, त्यांना निवडणुकीत तिकीट नको तरच हे शक्य आहे . अधिकाऱ्यांच्या बाबतीतही कडक धोरण ठेवायला हवे, नाहीतर अशा लोकांना उदो उदो सुरू राहिला तर ही भ्रष्टाची कीड अशीच वाढत जाणार आहे आणि म्हणून जो प्रश्न नाना पाटेकर यांनी एकनाथ शिंदे यांना विचारला तोच प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही आहे असे समजण्यास काही हरकत नाही.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ह्याचे विषयी बोलायलाच हवे.

नगरसेवक असो पंचायत समिती सदस्य अध्यक्ष जिल्हा परिषद अध्यक्ष सदस्य जिल्हा बँक अध्यक्ष संचालक, दूध संघ मार्केट कमिटी महामंडळ अध्यक्ष सदस्य मंत्री आमदार खासदार त्यांचे अगदी जवळचे कार्यकर्ते सहाय्यक ही मंडळी थोड्या दिवसातच मालामाल होत असते हे काही लपून राहत नाही. परंतु हा प्रश्न जे स्वतःला प्रधान सेवक समजतात त्यांना कोण विचारणार ? ही परिस्थिती न बदलण्यास जनताही तेवढीच कारणीभूत आहे . आपले काम पैसे देऊन करून घ्यायचे आणि भ्रष्टाचारावर गप्पा करायच्या. खरतर सर्वसामान्य जनतेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला हवा आहे .त्यासाठी सरकारने अनेक उपाय योजना केल्या आहेत, त्याचा उपयोग करून घ्यायला हवा. तक्रार करण्यासाठी टोल फ्री नंबर दिलेले आहेत आपण त्याच्या माध्यमातून तक्रार करू शकतो. परंतु आपली तशी मानसिकता नसते. होईल त्या मार्गाने काम करून घेणे हेच आपण जास्त पसंद करतो. १०६४ नंबर महाराष्ट्र सरकारने त्यासाठी उपलब्ध करून दिलेला आहे. ज्याच्यांवर गुन्हे दाखल आहेत,तुरुंगवास भोगून आले आहे, असे आमदार खासदार मंत्री यांचे पेन्शन आणि इतर सवलती तसेच प्रशासकीय अधिकारी कर्मचारी अशा प्रकरणात असतील, भ्रष्टाचारात असतील त्यांचे सुध्दा पेन्शन ग्रॅच्युइटी गोठवायला हवे. तरच अशा कडक कारवाईमुळे ना खाऊंगा ना खाने दूंगा याला काही अर्थ प्राप्त होईल.आणि भ्रष्टाचार विरोधी चळवळ अधिक व्यापक होईल.

## शब्दकोडे-२५६



**आडवे शब्द**

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव ६. पोलिसांवरील अधिकारी ९. ही धरून लगडी घालतात ११. छिद्र, जखम १२. जय पराजय १४. घोंगड्या विणणारी जमात १६. मोठा हातोडा १७. रम्य दृश्य १९. धमनी २१. मला २४. उपहास २५. शरीर २७. खरकट्याचा ढीग २९. श्रीकृष्णाचे एक नाव ३१. वचक, भीती ३२. हिंदीत शरीर ३३. बारीक झिणझिण ३५. वाक्बगार ३७. अभिमन्यूला ठार मारणारा ३९. फायदा ४०. दहा अब्ज ही संख्या ४१. लाज ४३. रसाळ ४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी ४६. जाणे-येणे, वहिवाट ४८. पायताण ४९. सीतेची जुळी मुले ५१. खदक ४३. '--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान है' ५४. पौराणिक आयुध ५५. ओझी उचलणारा ५७. सत्त्व ५९. जोखीम ६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट ६२. पोहणे ६४. गवताचे रुंद पान ६५. निवासस्थान ६६. मत देणारा ६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा ६९. भित्रा, पळ काढणारा ७०. कुलीन ७२. जाणकार ७५. पालव ७७. ढीग ७९. रक्तवाहिन्या ८०. जमीनदार ८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**

१. संरक्षण २. बाहेरच्या विरूद्ध ४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश ५. छोटी ६. सैनिक ७. जपणे ८. आवड ९. घट्ट, तणावाची स्थिती १०. उष्ण १३. प्रजा १५. दृष्टीभेट १६. गर्द, गच्च १८. वेगाने २०. शीतपेय २२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे २३. खरे तर हे काही जेवण नव्हे! २६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला! २८. माज ३०. आवाज, गोंगाट ३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम ३५. विनाश ३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते ३८. मृत्यूचा राजा ४१. संभवनीय ४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन ४४. नूतन ४७. माळी, बागवान ५०. काढलेली खोडी ५२. जाडसर पीठ ५३. सर्व ५४. मारुती, भीम ५५. हिंदुस्थानी ५६. उपस्थित ५८. उत्सवाचे दिवस ६०. च्या बद्दल ६३. तरतूद ६४. साडी ६५. जात्याचा आवाज ६६. मधुमक्षिका ६७. शील, उदारता ६८. गव्हाचे बारीक पीठ ६९. पुन्हा ७१. नवरा ७३. नवरत्नांपैकी एक ७४. खेडे ७६. फितुरी ७७. भूपती ७८. माळ, हार

## शब्दकोडे-२५५ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.रतिमदन ५.पराभव
८.कोळसा ११.नरम ११अ.रम
१२.नवरा १४.रक्षक १५.हाट
१६.सर १७.टकमक १९.वखार
२१.दासबोध २४.रग २५.गत
२७.पर २८.कारा २९.करवत
३१.सन ३२.सुपारी ३४.गोरी
३५.रकाना ३७.खानसामा
३९.क्षमायाचक ४२.दालन
४३.खरी ४४.कळस ४५.नगर
४७.जनकजननी ५१.झोपडी
५२.रीम ५३.चवड ५४.बाई
५५.कलप ५७.लता ५९.सागर
६१.गीताई ६३.धारातीर्थी पडणे ६५.सलग ६६.खल
६७.नारी ६८.टक ६९.अजा
७१.सखी ७२.रकम ७४.रीतभात
७६.डाका ७८.खतरनाक
८०.मानव ८२.रवि ८४.टपकन
८५.रज ८६.पदरमोड

**उभे उत्तर**

१.रत्नहार २.मन ३.दर
४.नमस्कार ५.परसदार
६.रामरस ७.वन ८.कोरा करकरीत ९.सारक
१०.चाकवत १३.वट १८.मगर
२०.खानेसुमारी २२.बोका
२३.धरा २५.गतकाल २६.मनन
२७.परीक्षक ३०.वरदायिनी
३१.सखा ३३.प्रयास
३६.नानकटाई ३८.साखरझोप
४०.माळकरी ४१.कफन
४५.नरक ४६.वडीलधारी
४८.कचरणे ४९.जव ५०.नडगी
५४.बाईलवेडा ५६.लखलखीत
५८.तारा ५९.सापट ६०.गडकरी
६२.तास ६४.तीरकमान
६६.खसखस ६७.नायनाट ६९.अभाविप ७०.जात ७३.मन
७५.तर ७७.कापड ७९.कप
८१.वर ८३.घार

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# कांदा निर्याती बंदी विरोधात शेतकरी आक्रमक
# संतप्त झालेल्या शेतकऱ्यांचा लासलगावी रस्ता रोको

**लासलगाव । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातबंदी लागू केल्यामुळे काल शुक्रवारी सकाळी नाशिक जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यामध्ये संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी कांद्याचे लिलाव बंद पाडले.कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा रोष पहाता कांद्याच्या व्यापाऱ्यांनी सुध्दा कांदा लिलावात सहभाग घेतला नाही.दरम्यान संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी कांदा निर्यातीवर बंदी विरोधात विंचूर कोटमगाव चौफुली येथे ठिय्या मांडून रस्ता रोको आंदोलन केले.या वेळी मोदी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

लासलगाव बाजार समितीच्या आवारात कांद्याचे लिलाव बंद होताच सभापती बाळासाहेब क्षीरसागर,उपसभापती गणेश डोमाडे,सदस्य ललित दरेकर,व्यापारी सदस्य प्रवीण कदम,बाळासाहेब दराडे सचिव नरेंद्र वाढवणे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वाघ यांनी भेट देऊन व्यापारी व शेतकऱ्यांची चर्चा केली.सभापती क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांना वेठीस धरू नका म्हणत व्यापाऱ्यांना लिलाव सुरू करण्याची विनंती केली त्यावेळी शेतकऱ्यांनी लिलाव सुरू करण्यास काहींनी मान्यता दिली तर काही शेतकऱ्यांनी विरोध केला मात्र व्यापाऱ्यांनी नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांची चांदवड येथे होणाऱ्या बैठकीत नंतर लिलाव सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल अशी भूमिका जाहीर केली.त्यावेळी काही शेतकरी रस्त्यावर येण्याचा प्रयत्न करत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वाघ यांनी चांदवड येथील निर्णय होईपर्यंत शेतकऱ्यांना रस्त्यावर येण्यास रोकले मात्र दुपारी संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी विंचूर कोटमगाव चौफुली येथे रस्त्यावर येऊन रस्ता रोको आंदोलनाचा पवित्रा घेतला.

कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी २८ ऑक्टोबर रोजी कांद्यावरील निर्यात मूल्य दर ८०० डॉलर प्रति टन करण्याचा निर्णय केंद्राकडून घेण्यात आला होता.३१ डिसेंबर पर्यंत एमइपी ८०० डॉलर प्रति टन ठेवण्यात आले होते.मात्र ८ डिसेंबर २०२३ रोजी पुन्हा वाणिज्य विभागाने नोटिफिकेशन काढून कांद्यावर निर्यात बंदी लादली आहे. ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यात बंदी राहणार आहे. गेल्या हंगामात पावसाने पाठ फिरवल्याने तसेच काढणीला आलेल्या कांद्याला अवकाळीचा फटका बसल्याने कांदा आवक घटली आहे.पुन्हा कांदा दरावर अंकुश राहण्यासाठी केंद्र सरकारने निर्यात बंदी लावली आहे. मागील काही दिवसांपासून नाशिक जिल्ह्यातील लासलगाव सह जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या दरात चांगली सुधारणा होत कांद्याला चार हजार रुपये प्रतिक्विंटल पर्यंत बाजारभाव मिळत होते. परंतु केंद्र सरकारने गुरुवारी रात्री अचानक कांद्याची निर्यात बंदीची अधिसूचना काढल्यामुळे शुक्रवारी सकाळी सर्व बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या बाजारभावात १५०० ते २००० रुपयांची घसरण झाल्यामुळे केंद्र सरकारने घेतलेल्या कांदा निर्यात बंदीच्या निर्णयाचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन करून जोरदार निषेध केला आहे



**दरम्यान शुक्रवारी दुपारी चांदवड येथे नाशिक जिल्हा कांदा व्यापारी असोसिएशन ची तातडीची बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत जो पर्यंत केंद्र सरकार कांद्यावरील निर्यात बंदी उठवत नाही तो पर्यंत नाशिक जिल्ह्यातील बाजार समितीत कांद्याच्या लिलावात कांदा व्यापारी असोसिएशनचे व्यापारी सहभागी होणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला.**

ऐन खरीप हंगामात पावसाने पाठ फिरवल्यामुळे यंदा खरीप कांदा लागवडीवर मोठा परिणाम झाला आहे त्यातच नोव्हेंबर अखेर झालेली गारपीट व अवेळी पाऊस यामुळे कांदा सह अन्य पिकाचे मोठे नुकसान झाले त्यात दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातबंदीचा निर्णय घेऊन केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे.

- सुनील गवळी, कांदा उत्पादक शेतकरी

केंद्र सरकार कांदा निर्यातीच्या बाबत धर सोडीचे निर्णय घेत असल्याने कांद्याची जागतिक बाजारपेठ गमवण्याची वेळ कांदा निर्यातदार व्यापाऱ्यांवर आली आहे तसेच परकीय चलन सुद्धा देशाचे बुडणार आहे या निर्णयाचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांनाही फटका बसणार असल्याने केंद्र सरकारने या निर्णयाचा फेरविचार करावा अशी मागणी कांदा निर्यातदार व्यापारी करत आहे

- अफजल शेख व प्रवीण कदम, कांदा निर्यातदार व्यापारी

राज्यात अवकाळी पाऊस व गारपीट मुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे त्यात प्रामुख्याने कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.अश्या परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील, अशी अपेक्षा होती परंतु केंद्र सरकारने कांद्याची निर्यात बंदी करून शेतकऱ्यांवर घाव घालण्याचे काम केंद्र सरकारने केले आहे.

- गुणवंत होळकर, प्रवक्ते,नाशिक जिल्हा कॉंग्रेस कमिटी

## न्यूज कॉलम

### प्रवाशाची बस वाहकास मारहाण

**साक्री ।** छत्रपती संभाजी नगर येथून सुरतकडे जाणाऱ्या बसची साक्री तालुक्यातील शेवाळी फाट्याजवळ प्रवाशाने बेल वाजवुन थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यास वाहकाने विचारणा केली असता राग आलेल्या प्रवाशाने बेदम मारहाण केली तसेच चालकासही शिवीगाळ केली. चालक साईनाथ कारभारी बडेकर हे एम.एच.२०/बी. एल.४०३६ क्रमांकाची बस प्रवासी घेवुन जाण्याकरीता निघाले. बस धुळे बसस्थानकावर आल्यावर रविंद्र दगा साळुंके याने साक्रीचे तिकीट घेतले. बस शेवाळी फाट्याजवळ आल्यावर त्याने वाहकास न विचारता बेल वाजवली. लोकल स्टॉप घेत नाही, असे सांगितले. याचा राग आल्याने त्याने शिवीगाळ केली तसेच अंगावरील शर्टाचा खिसा फाडून मारहाण केली.

### विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन

**धुळे ।** नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयात ११ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे राहतील.

# मध्य नाशिक मतदारसंघात धनगर समाजाच्या वसतीगृहास मंजुरी

## ११५ कोटी रुपयांची कामे मंजूर, वनभवन, भूमी अभिलेख कार्यालयांचे बांधकामही होणार

### आ. फरांदेंच्या पाठपुराव्यास यश

**नाशिक । प्रतिनिधी**

मध्य नाशिक मतदारसंघाच्या विकासाच्या दृष्टीने ११५ कोटी रुपयांच्या कामांना पुरवणी अर्थसंकल्पात मंजुरी मिळविण्यास आ. प्रा. देवयानी फरांदे यांना यश आले आहे. यात प्रामुख्याने धनगर समाजाचे वस्तीगृह, नवीन वनभवन, भूमी अभिलेखे विभागाचे नवीन कार्यालय बांधणी, संदर्भ सेवा रुग्णालयातील प्रलंबित बांधकामे, महिला रुग्णालयासाठीचा निधी या



कामांचा समावेश आहे.

आ. देवयानी फरांदे यांनी मध्य नाशिक मतदार संघासाठी विविध कामे सुचविली होती. त्यात ११५ कोटी रुपयांच्या कामांना पुरवणी अर्थसंकल्पात मंजुरी मिळाली आहे. यात नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघात धनगर समाजाचे नवीन वस्तीगृह बांधण्यासाठी ४३.५२ कोटी रुपये मंजुर झाले आहेत. शहरात शिक्षणासाठी आलेल्या धनगर समजाच्या विद्यार्थ्यांचा या वसतीगृहाच्या माध्यमातून मोठा प्रश्न सुटणार आहे. नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातील वनविभागाची कार्यालयाची अवस्था बिकट आहे. कार्यालयाचा व्याप बघता हे कार्यालय अपूरे पडते. त्यामुळे जुने कार्यालय पाडून त्या ठिकाणी नवीन वनभवन बनण्यासाठी २५ कोटी रुपयांस मंजुरी मिळाली आहे. तसेच सीबीएस येथे भूमी अभिलेख विभागाचे नवीन कार्यालय बांधण्यासाठी १४.९९ कोटी रुपये मंजुर करण्यात आले आहे. संदर्भ सेवा रुग्णालय बांधण्यासाठी २० कोटींचा अतिरिक्त निधी मिळणार आहे. भाभा नगर येथील महिला रुग्णालयासाठी यापूर्वी मंजूर असणार्या कामाला ४ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधीही मंजुर झाला आहे. त्यामुळे नाशिकमधील महत्वाचे प्रश्न या निमित्ताने सुटणार आहे. या सर्व कामांची लवकरच टेंडर प्रक्रिया करण्यात येणार असून लवकरच कामांना सुरुवात करण्यात येईल, असे आ. देवयानी फरांदे यांनी सांगितले. नाशिकच्या विकासात महत्वाची भर घालणार्या या कामांना मंजुरी देणार्या महायुती सरकारमधील सर्व मंत्रीगणांचे आ. फरांदे यांनी आभार मानले आहेत.

# आदिवासी गावांच्या विकासासाठी ४४ कोटी रूपयांचा निधी मंजूर

**नाशिक ।** आदिवासींसह ग्रामीण भागातील गावास्तरावरील नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडुन सुरू असलेल्या सततच्या प्रयत्नांना यश आले असून नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी अर्थसंकल्पात याकामी ४४ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या उपलब्ध झालेल्या निधीतून नाशिक, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या तीन तालुक्यांमधील वीस गावांमध्ये विकास कामे करण्यात येणार असल्याची माहिती खा. गोडसे यांनी दिली आहे. गावस्तरावर मुलभूत सोयी-सुविधा होणेकामी शासनाकडुन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांकडुन खा. गोडसे यांच्याकडे सातत्याने होत होती. यातुनच आदिवासींसह ग्रामीण भागातील गावास्तरावरील नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी निधी उपलब्ध होणेकामी गेल्या काही महिन्यांपासुन खा. गोडसे प्रयत्नशील होते.

# खान्देशची अहिराणी भाषा, संस्कृती, पयर्टन, देवस्थान वाचवून इतिहासाची माहिती द्या

### छावा जनक्रांती संघटनेचे अध्यक्ष शरद पवार यांची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथे राहणाऱ्या खान्देशी विभागातील लोकांसाठी होणाऱ्या खान्देश महोत्सवात खान्देश भागातील संस्कृतीची तसेच साहित्यिक, कवी, परंपरा यांची माहिती दिली जावी. अन्यथा आ. सीमा हिरे यांचा खान्देश महोत्सव होऊ देणार नाही, जनआंदोलन किंवा आत्मदहन करू असा इशारा छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पर्यटन मंत्री तसेच जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, पोलीस आयुक्त यांना दिला आहे.

छावा जनक्रांती संघटनेतर्फे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटनमंत्री गिरीश महाजन, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे, नाशिक महसूल आयुक्त, नाशिक जिल्हाधिकारी, नाशिक पोलीस आयुक्त, नाशिक महापालिका आयुक्त, उपसंचालक पर्यटन विकास महामंडळ, उपसंचालक सांस्कृतिक विभाग आदींना संघटनेतर्फे



मागण्यांचे निवेदने देण्यात आले आहेत. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खान्देश भाग हा महाराष्ट्र राज्य संस्कृतीचे अप्रतिम सौंदर्य व दर्शन घडविणारा खान्देशपट्टा आहे.

येत्या दि. २२ ते २५ डिसेंबर या कालावधीत नाशिक येथील आ. सीमा हिरे व त्यांच्या कन्या रश्मी हिरे-बेडाळे यांनी ठक्कर डोम, सिटी सेंटर मॉल जवळ, नाशिक येथे खान्देश महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवामध्ये पर्यटन व संस्कृती, कला-अविष्कार, अहिराणी साहित्य संम्मेलन, खाद्य महोत्सव प्रदर्शन याचे आयोजन केलेले आहे. परंतू खान्देश महोत्सवामध्ये ज्या मुद्दयाच्या आधारे खान्देश महोत्सवाचे आयोजन आ. सीमा हिरे यांनी केलेले आहे त्यात कोणतेही मुद्दे खान्देश महोत्सवामध्ये पुर्ण केले जात नाहीत. त्यामुळे त्या खान्देश महोत्सवाला संघटना विरोध करत असल्याचे निवेदन छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्र यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच शासनाच्या विविध स्तरावर दिले आहे. खान्देश महोत्सवामध्ये अहिराणी साहित्य संम्मेलन याअंतर्गत खान्देश मधील अहिराणी भाषेचे जाणकार लोकप्रिय कवी, कवियत्री, लेखक, समाजसेवक, समाजसुधारक, स्वातंत्र्य सैनिक यांचा सहभाग किंवा त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल माहिती देणे अपेक्षित आहे. परंतू खान्देश महोत्सवात तशा प्रकारची माहिती न देता मतांचे राजकारण करून खान्देशी माणसाला दुर्लक्षीत करून मतांच्या राजकारणासाठी हा खान्देश महोत्सव आ. सीमा हिरे या महाराष्ट्र शासनाचा निधी तसेच आमदार निधीतून घेवून मतांच्या राजकारणासाठी त्याच्या वापर करीत आहेत. असा आरोप छावा जनक्रांती संघटनेचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिलेल्या निवेदनात केला आहे.


अॅड.विशाल भांडारकर
नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब व स्तर यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज नं. १४००/२०२३**

१) श्री मुकुंद आसाराम माळी २) श्रीमती हिराबाई आसाराम माळी ३) सौ. प्रतिभा दिनेश मोरे ४) विजया शिवदास पाटील (मयत) ४.१) सौ. चंचल भिका मंडळ ४.२) सौ. दिपाली भालचंद्र सुर्यवंशी ४.३) सौ. हर्षाली सुरेश महाजन ४.४) सौ. रूपाली अजय देशमुख ....... अर्जदार

वि.
कोणीही नाही ......सामनेवाला
कै. आसाराम पांडु उर्फ पांडुरंग माळी
(मृत्यु दि. ०६/०३/२०१९) ...... मयत

ज्या अर्थी वरील अर्जदार हे मयत कै. आसाराम पांडु उर्फ पांडुरंग माळी यांचे वारस आहेत. मयत कै. आसाराम पांडु उर्फ पांडुरंग माळी हे दि.०६/०३/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. मयताच्या नावे असलेली शेत मिळकत १) मौजे कापडणे ता.जि. धुळे येथील गट नं. १४२३/३ त्यासी एकूण क्षेत्र १ हे. २० आर. आकार रू.५.७५ पैसे २) मौजे कापडणे ता. जि. धुळे येथील गट नं. २१५/३ त्यासी एकूण क्षेत्र ० हे. २३ आर. आकार रु. १.५८ पैसे येणे प्रमाणे या मिळकतींवर अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय, व स्तर सो. धुळे यांचे कोर्टात दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १४००/२०२३ दाखल केलेला आहे.

त्या अर्थी अर्जाबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक तक्रार असल्यास त्यांनी धुळे येथील मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो. कोर्ट नं. २ न्यायालयात दि. २३/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा. स्वतः अगर वकिल साहेबांमार्फत हजर राहून लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजून वारस दाखला अर्जदारांच्या लाभात देण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस दि.०५/१२/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.
दि.०५/१२/२०२३
स्थळ : धुळे
शिक्का
आदेशावरुन
**कामगिरी कारकुन** दिवाणी न्यायालय, व स्तर धुळे
**अधिक्षक** दिवाणी न्यायालय, व स्तर धुळे



अॅड. मनोहर थोरात
नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज न.१३८६/२०२३**

१) लक्ष्मीबाई जंगलुसिंग लोधी (राजपुत), उ. व. ७३ वर्ष, धंदा - घरकाम (२) मायाबाई किशोर लोधी (राजपुत), उ. व. ४३ वर्ष, धंदा- घरकाम (३) विशाल किशोर लोधी (राजपुत), उ. व. २१ वर्ष, धंदा - शिक्षण, नं. १ ते ३ रा. मोरशेवडी, ता. जि. धुळे. (४) सौ. सोनाली प्रकाशसिंग राजपुत, उ. व. २३ वर्ष, धंदा - घरकाम, रा. दर्गा बेस, सितलामाता मंदीराच्या मागे, कादराबाद, जालना (५) सौ. अश्विनी किशोर राजपुत, उ. व. १९ वर्ष, धंदा - घरकाम, रा. इंदेवाडी, जालना. (६) सचिन किशोरसिंग लोधी (राजपुत), उ. व. १७ वर्ष, धंदा - शिक्षण (अर्जदार नं. १ स्वत: करीता व अर्जदार नं. ६ करीता अ.पा.क. आई म्हणुन), रा. मोरशेवडी, ता. जि. धुळे. ....अर्जदार

वि.
कोणीही नाही ...सामनेवाला
आणि
किशोर जंगलु राजपुत (लोधी) (मयत)
मयत दि. २२/१०/२०२३,
मृत्यु ठिकाण : मोरशेवडी, ता. जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात किशोर जंगलु राजपुत (लोधी) (मयत) यांचे अर्जदार नं. १ ते ६ हे कायदेशीर वारस असून वारस दाखला हा शासकीय-निमशासकीय कामासाठी, पेन्शनकामी तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. २९/११/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १६/०१/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. २, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोटने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०५/१२/२०२३
शिक्का
आदेशावरुन
**कामगिरी कारकुन** मे. दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे
**अधिक्षक** मे. दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे



**जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे न्यायालयात**

श्री. अलीरखान गुलाब मुसलमान
पत्ता :- रा. न्याहळोद ता. जि. धुळे.....अर्जदार
विरूध्द
ग्रामविस्तार अधिकारी, ग्रामपंचायत
कार्यालय न्याहळोद, ता. जि. धुळे ....जाबदेणार

श्री. अलीरखान गुलाब मुसलमान रा. न्याहळोद ता.जि. धुळे यांनी इकडील कार्यालयास अर्ज करून त्यांची चुलत बहिण वाहिदा सलीमखा पठाण हिचा जन्म दि.०१/०६/१९७४ रोजी मौजे- न्याहळोद ता.जि. धुळे येथे झाला आहे. तरी महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंद अधिनियम १९६९ चे कलम १३ पोट कलम ३ अन्वये जन्म नोंद होणे व तसे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा खुलास दयावयाचा / मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. ०५/०१/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा तहसिल कार्यालय धुळे ग्रामीण, स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढिल कारवाई करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस धुळे येथिल मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे सही शिक्यानिशी दि.०५/१२/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- धुळे
दिनांक :- ०५/१२/२०२३
शिक्का
**कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार धुळे, ग्रामीण**



प्रोसेस जमा
अॅड. गोविंद, बी. साखरे
नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. १४१४/२०२३**

१) फातेमा इकबाल अहमद शेख, उ.व. ४२ वर्षे, धंदा- घरकाम (२) मुबिन इकबाल शेख, उ.व. २७ वर्षे, धंदा - व्यापार, नं. १ व २ रा. प्लॉट नं. ३२, गरीब नवाज नगर, कुबा मस्जीद जवळ, धुळे, ता. जि. धुळे (३) हिना कौसर शेख रिझवान, उ.व. २४ वर्षे, धंदा -घरकाम, रा. नयागाव, ईस्लामपुरा, छोटी गुजरी जवळ, चाळीसगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव (४) शेख मुस्कान शेख फैसल, उ.व. २२ वर्षे, धंदा- घरकाम, रा. प्लॉट नं. ११ / अ, अंजनदाताशाह सोसायटी, चाळीसगाव रोड, धुळे, ता. जि. धुळे (५) शेख चाँद शेख अमिर, उ.व. ७२ वर्षे, धंदा- व्यापार (६) महेमुदा बी चाँद शेख, उ.व. ७० वर्षे, धंदा- घरकाम, नं. ५ व ६ रा. प्लॉट नं. ३२, गरीब नवाज नगर, कुबा मस्जीद जवळ, धुळे, ता. जि. धुळे
.....अर्जदार

वि.
कुणीही नाही .....सामनेवाला
इकबाल चाँद शेख ......(मयत)
मृत्यु दिनांक - १९/०९/२०२३
मृत्यु ठिकाण - प्लॉट नं. ३२, गरीब नवाज नगर, कुबा मस्जीद जवळ, धुळे, ता. जि. धुळे
बॉम्बे रेग्युलेशन कायदा तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे
वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ६ यांनी मयत इकबाल चाँद शेख यांचे कायदेशिर वारस न मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि. कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. २९/०१/२०२४ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही बाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ४ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत इकबाल चाँद शेख यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.
स्थळ : धुळे
दि. ०७/१२/२०२३
शिक्का
आदेशावरुन
**कामगिरी कारकुन** दिवाणी न्यायालय, धुळे
**अधिक्षक** दिवाणी न्यायालय, धुळे

## न्यूज कॉलम

### पिंपळादेवी विद्यालयात एड्स दिन साजरा

धुळे । शहरातील शहरातील मोहाडी उपनगरातील श्री पिंपळादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक एड्स निर्मूलन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर. व्ही. पाटील होते. हर्षदा डिगराळे, धनश्री डावखोर, या विद्यार्थ्यांनी घोषवाक्ये, कविता व मनोगते व्यक्त केली. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### आरोग्य मित्रांचे कामबंद आंदोलन

धुळे । तुटपुंज्या वेतनामुळे आर्थिक कुचंबना होत असलेल्या आरोग्य मित्रांनी आजपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनात पंकज अहिरे, किरण ढमढेरे, अरुण ढिवरे, सागर महाजन, विनोद निकम, संदीप माळी, वसुंधरा चित्ते आदी सहभागी झाले. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत २०१२ पासून आरोग्य मित्र म्हणून कार्यरत आहेत. पगारवाढ २५००० रुपये मासीक इतकी करण्यात यावी यासाठी कामबंद आंदोलन सुरु केले आहे.

### काळखेडे फाट्यावर भूयारी मार्गाची मागणी

# तरवाडे गावाच्या उड्डाणपूलासाठी ना.गडकरींना भेटणार : आ.कुणाल पाटील

धुळे । प्रतिनिधी

उड्डाण पुलाअभावी तरवाडेसह मोरदडतांडा,सिताणे,नाणे,नंदाळे या परिसरातील प्रवास धोकेदायक झाला आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वरील तरवाडे गावाजवळ उड्डाणपूल करण्यात यावा यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री ना.नितीन गडकरी यांची लवकरच भेट घेणार आहे.त्याकरीता तत्काळ उड्डाणपूलाचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना आ.कुणाल पाटील यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक,जळगाव यांना दिल्या. दरम्यान शिरुड, मुकटीसह राष्ट्रीय महामार्ग क्र.६ आणि क्र.२११ लगत असलेल्या धुळे तालुक्यातील गावामधील शेतकरी,स्थानिक रहिवाशी आणि वाहनधारकांच्या या महामार्गामुळे उद्धवलेल्या विविध समस्या सोडविण्यासाठी आ.कुणाल पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक, जळगाव आणि धुळे येथील अधिकार्यांची बैठक घेण्यात आली.



राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ आणि क्र.६ हे दोनही महामार्ग धुळे तालुक्यातून जातात. धुळे सोलापूर महामागाचे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे तसेच तसेच सुरत नागपूर या महामार्गाचेही काम प्रगतीपथावर आहे. या दोनही मार्गाचे काम करीत असतांना महामार्गावरलगत येणार्या गावातील रहिवाशी,शेतकरी आणि वाहनधारकांच्या दैनंदिन दळणवळणाच्या समस्यांकडे दुर्लक्ष झाल्याने नागरीकांमध्ये अपघाताची भिती निर्माण झाली असून रात्री अपरात्री प्रवास करणेही धोकेदायक झाले आहे. त्यामुळे उद्भवलेल्या विविध समस्या सोडविण्यासाठी आ.कुणाल पाटील यांच्या उपस्थितीत नुकतीच धुळे येथील संपर्क कार्यालयात बैठक घेण्यात आली.बैठकीला बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, माजी सभापती गुलाबराव कोतेकर, खरेदी विक्री संघाचे चेअरमन लहू पाटील, बाजार समितीचे संचालक साहेबराव खैरनार,ज्येष्ठ नेते शिवाजी बोरसे,उपसभापती योगेश पाटील,संचालक एन.डी.पाटील, माजी पं.स.सदस्य पंढरीनाथ पाटील, आबा शिंदे शिरुड, बाजार समिती संचालक रावसाहेब पाटील, माजी संचालक माधवराव पाटील,भाऊसाहेब पाटील, कुणाल पाटील,हर्षल साळुंके आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभातर्फे संताजी महाराज जयंती उत्सवात साजरी




धुळे । प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभाच्या वतीने श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची ३९९ वी जयंती उत्साह व जल्लोषात तसेच फटाके आतिषबाजीत साजरी करण्यात आली. यावेळी प्रदेश महासचिव नरेंद्र चौधरी, जिल्हा अध्यक्ष कैलास चौधरी, प्रथम महापौर भगवान बापूजी करनकाळ, महापौर प्रतिभा चौधरी, माजी महापौर जयश्री अहिरराव, नगरसेवक नरेश चौधरी, गिरीश चौधरी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

गुरु शिष्य स्मारक येथे महाआरती व प्रतिमा पुजन करण्यात आले. महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा महिला आघाडीच्या वतीने कुष्ठरोग आश्रमात पुरुषांना व महिलांना महापौर प्रतिभा चौधरी, माजी महापौर जयश्री अहिरराव, कल्पना महाले, अल्फा अग्रवाल यांच्या हस्ते टी शर्ट व महिलांना साडी वाटप करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा युवा प्रदेश महासचिव नरेंद्र चौधरी, जिल्हा अध्यक्ष कैलास चौधरी, विभाग कार्याध्यक्ष शशिकांत चौधरी, विभाग उपाध्यक्ष अनिल अहिरराव, युवा आघाडी उपाध्यक्ष तुषार चौधरी, डॉ. भूषण चौधरी, जिल्हा अध्यक्ष दिनेश बागुल, शहराध्यक्ष गणेश चौधरी, सचिव दिलिप सुर्यवंशी, डॉ गणेश चौधरी, जिल्हा संघटक रमेश करनकाळ, मनोहर चौधरी सर पप्पू शेठ अहिरराव, किशोर थोरात, जिल्हा उपाध्यक्ष किरण बागुल, महिला जिल्हा अध्यक्ष छायाताई करनकाळ, विभागीय कार्याध्यक्ष सौ. वैशाली चौधरी, मनोज भैय्या चौधरी, किरण चौधरी, विनोद चौधरी, विजय नेरकर सर, कल्पेश थोरात, पंकज चौधरी, ललित चौधरी, युवराज (सनी) चौधरी, रितेश चौधरी, भटू चौधरी, संजय चौधरी सर अनिल चौधरी, महेश चौधरी, विलास चौधरी, मुकेश चौधरी, संदिप चौधरी, राजू चौधरी, उदय चौधरी, महेश बावीस्कर, सर्व पदाधिकारींनी परिश्रम घेतले.

# सय्यदनगर येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

### ग्रामस्थांना विविध योजनांची माहिती देऊन केली जनजागृती

धुळे । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेले मात्र अद्याप ज्यांना लाभ मिळू न शकलेल्या पात्रताधारक व्यक्तिंपर्यंत केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ पोहोचावा म्हणून केंद्र शासनातर्फे धुळे जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार साक्री तालुक्यातील सय्यदनगर या ग्रामपंचायतीमध्ये विकसित भारत संकल्प यात्रा उत्साहात संपन्न झाली.




विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून ग्रामस्थांना केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत योजना, पीएम गरीब कल्याण योजना, दीनदयाल अंत्योदय योजना, पीएम आवास योजना, पीएम उज्ज्वला योजना, पीएम विश्र्वकर्मा योजना, पीएम किसान सन्मान योजना, किसान क्रेडीट कार्ड, पीएम पोषण अभियान, हर घर जल, जल जीवन मिशन, स्वामित्व योजना, जनधन योजना, जीवन ज्योती योजना, सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, पीएम प्रणव, नॅनो फट्रीलायझर या योजनांची माहिती एलईडी व्हॅनमार्फत देण्यात आली. तसेच लाभार्थ्यांकडून विविध योजनांचे अर्ज भरुन घेण्यात आले. यावेळी सैय्यदनगर येथील एका महिला लाभार्थ्यांस घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला. तसेच लाभार्थ्यांना विविध योजनेच्या लाभाचे वाटप करण्यात आले. यावेळी लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणी कशी करावी याबाबत शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. प्रांरभी यात्रेचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले. यावेळी सय्यदनगर येथील सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ व लाभार्थी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# एआरटी केंद्रातर्फे विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



### जागतिक एड्स दिन कार्यक्रम साजरा

धुळे । प्रतिनिधी

जागतिक एड्स दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीच्या सूचनेनुसार जिल्ह्यात पंधरवडा साजरा होत आहे. येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एआरटी केंद्र, विहान, सप्तशृंगी बहुउद्देशीय संस्थेतर्फे विविध स्पर्धा झाल्या.

अधिष्ठाता डॉ. अरुण मोरे अध्यक्षस्थानी होते. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजित पाठक, डॉ. सुनील लिलाणी, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. शिल्पा राव, डॉ. ज्योती पाटील, डॉ. शिल्पा पवार, डॉक्टर माधुरी सूर्यवंशी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती शीतल पाटील प्रमुख पाहुणे होते. ए आर टी केंद्रातील एचआयव्ही बाधित ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी निबंध, चित्रकला स्पर्धा झाली. त्यात प्रथम, द्वितीय, तृतीय, क्रमांक विजेत्यांना अनुक्रमे पंधराशे, हजार आणि सातशे रुपये, मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मुलांना पोषण आहाराचे वाटपही यावेळी करण्यात आले.

# साक्री तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडी पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर

साक्री । प्रतिनिधी

साक्री तालुका अध्यक्षपदी कविता रमेश बोरसे, कार्याध्यक्षपदी मालपूर येथील अंकिता भामरे तर जिल्हा उपाध्यक्षपदी रेखा प्रमोद अहिरे, जिल्हा कार्याध्यक्षपदी श्रीमती. मंगलाबाई नवसारे यांची निवड.

साक्री तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक अंगणवाडी सेविका पतसंस्था, साक्री येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीसाठी धुळे जिल्हा राष्ट्रवादी महिला आघाडीचे अध्यक्ष उषा पाटील धुळे जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सरचिटणीस प्रा.नरेंद्र तोरवणे, धुळे जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी किसान सभेचे अध्यक्ष सयाजीराव ठाकरे, साक्री तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष गिरीश नेरकर साक्री तालुका राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस अध्यक्ष कल्पेश सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.



याप्रसंगी उपस्थित असलेल्या प्रमुखांच्या हस्ते सर्व महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.साक्री तालुका राष्ट्रवादी महिला आघाडीच्या अध्यक्षपदी उंभरे ता. साक्री येथील कविता बोरसे तर जिल्हा उपाध्यक्ष पदी रेखा अहिरे यांची निवड करण्यात आली तसेच अश्र्विनी भदाणे तालुका उपाध्यक्ष, सुरेखा महाले तालुका उपाध्यक्ष, तृप्ती प्रवीण पाटील तालुका सरचिटणीस, वैशाली भदाणे तालुका सरचिटणीस, पुष्पा वाघ चिटणीस, आशाबाई काकुस्ते तालुका सचिव, अनिता सुनील पाटील तालुका सचिव, पूनम काकुस्ते तालुका सचिव आदी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी सूत्रसंचालन प्रा. नरेंद्र तोरवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन तालुका अध्यक्ष गिरीश नेरकर यांनी केले.

# नाशिक-निफाड-येवला राज्य मार्ग क्र. २ कॉंक्रीटीकरणासाठी ५६० कोटीचा निधी

नागपूर । प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील नाशिक-निफाड-येवला या चौपदरी रस्त्याचे पिंपळस ते येवला दरम्यानच्या कॉंक्रीटीकरण करण्यासाठी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नातून आशियाई विकास बँक प्रकल्पातून डिसेंबर २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये ५६० कोटी निधीची तरतूद करण्यात आहे. त्यामुळे नाशिक-निफाड-येवला रस्त्याच्या सुधारणेच्या कामाचा प्रश्न मार्गी लागला असून या रस्त्यावरील दळणवळणास अधिक गती प्राप्त होणार आहे.

सन २००४ साली छगन भुजबळ यांनी येवला मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केल्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांच्या माध्यमातून नाशिक ते येवला या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात आले होते. या चौपदरी रस्त्यामुळे या मार्गाने वेगाने वाहतूक सुरू होऊन नागरिकांना कमीत कमी वेळेत प्रवास करणे शक्य झाले होते. त्यानंतर गेल्या काही वर्षांपासून सदर रस्त्यावर प्रचंड खड्डे निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात रस्ता नादुरुस्त झाल्याने अनेक अपघात होत होते. तसेच वाहतुकीस अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने रस्त्याच्या नूतनीकरणासाठी भुजबळ यांचे शासनाकडे सातत्याने प्रयत्न सुरू होता. गेल्या अर्थसंकल्पातून या रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्यासाठी ५६ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

# पटेल महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन संपन्न



शिरपूर । प्रतिनिधी

आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयात करियर मार्गदर्शन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. आर. साळुंखे उपस्थित होते. व्याख्याता म्हणून पर्यवेक्षक एन. ई. चौधरी उपस्थित होते. एन. ई. चौधरी यांनी इयत्ता बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी त्याचसोबत स्पर्धा परीक्षा विषयी वेळेचे नियोजन कसे असले पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले.

प्राचार्य पी. आर. साळुंखे अध्यक्ष भाषणात म्हणाले, आयुष्यातील महत्त्वाच्या परीक्षा दहावी व बारावी परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन आपले व्यवसाय कौशल्य उत्तम पद्धतीने वापरावे. येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्यात व समाजातील प्रेरणादायी व्यक्तींच्या जीवनाविषयी विविध उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले . कार्यक्रमाला एन. एस. एस. प्रमुख बी. एन. अहिरे, वाणिज्य विभाग प्रमुख गुलाब मराठे, एस. आर. महाजन, एस. आर. पाटील, डी एस साळुंखे, श्रीमती आर. ए. जोशी, श्रीमती जे. जे. माळी. श्रीमती बी. आर. पाटील, श्रीमती के. एम. राजपूत व मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. आर. पाटील यांनी तर आभार के. एम. राजपूत यांनी मानले.

# नालंदा विपशना केंद्र व गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

धुळे । प्रतिनिधी

येथील नालंदा बहुउद्देशीय संस्था आणि गुड मॉर्निंग ग्रुप, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने धुळे शहरातील बोरसे नगर येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन सामुदायिक बुद्धवंदना घेण्यात आली. याप्रसंगी गुड मॉर्निंग ग्रुपचे जेष्ठ सदस्य पंजाबराव देशमुख यांनी पुरोगामी विचार म्हणजे काय याविषयी उदाहरणासह सविस्तर विवेचन केले. पुरोगामी विचार माणसाला प्रगतीकडे नेणारा आहे, तर प्रतिगामी विचार अधोगतीकडे,



अंधश्रद्धेकडे नेणारा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रत्येक विचार पुरोगामी व देशाला महासत्तेकडे नेणारा आहे, त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे हीच त्यांना आदरांजली ठरेल, असे देशमुख म्हणाले.

पी. यु. पवार म्हणाले की, सामाजिक मागासलेपण म्हणजे काय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अभ्यास करून समजून घेतले होते. म्हणूनच शाहू महाराजांच्या विचारसरणीचे पालन करून आरक्षणाची तरतूद राज्य घटनेमध्ये त्यांनी केली. सामाजिक मागासलेपण आणि आरक्षण याचा योग्य समन्वय साधणे योग्य आहे असे पवार म्हणाले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक डी. आर. जाधव, एम. बी. जगताप, अनिल बिरारी, राजकिशोर तायडे, एस. व्ही. बैसाणे, लोटन बापू वाघ, प्रा. योगेश सोनवणे, अविनाश कोकणी, प्रशांत खैरनार आदी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# महापरिनिर्वाणदिनी करुणा सोशल ब्लड डोनर ग्रुपचं रक्तदान शिबीर संपन्न

धुळे । प्रतिनिधी

भारतीय संविधानाचे निर्माते विश्र्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त धुळे शहरात करुणा सोशल ब्लड डोनर ग्रुप धुळे यांच्या वतीने सालाबादाप्रमाणे रक्तदान गेल्या २२ वर्षांपासून अविरतपणे सुरुच आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने महारक्तदान शिबीर आंतरराष्ट्रीय अभियान अंतर्गत ब्लड फॉर बाबासाहेब अभियान ६ डिसेंबर २०२३ ला देश विदेशात एकाच दिवशी एकाच वेळी अमेरिका, युरोप, कॅनडा, न्युजिलँड, युएई, ऑस्ट्रेलिया व भारतातील आणि महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यात एकाच वेळेस रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.




धुळे शहरात बुधवार दिनांक ६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९ ते सायं. ५ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती पुतळा, शहर पोलीस स्टेशन समोर, बस स्टँड जवळ, धुळे येथे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीराचे उद्घाटन सुप्रसिध्द अस्थिरोग तज्ञ डॉ. कृष्णमोहन सैंदाणे यांच्या हस्ते झाले. यावेळी करुणा सोशल ब्लड डोनर ग्रुपचे अध्यक्ष डॉ.शरद भामरे, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, धुळे शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, प्रा. नाना देवरे, देविदास जगताप, वसंत चव्हाण, गौतम भामरे, ॲड. मधुकर भिसे, मधुकर निकम, ज्ञानेश्र्वर भामरे आदी मान्यवर उपस्थित होते.

रक्तदान शिबीरात गोकुळ बापू भामरे, अनिल कैलास पवार, कैलास बाविस्कर, किरण नरेंद्र नगराळे, कपिल शिवाजी बिऱ्हाडे, भिमराव शंकर बोरसे, रामचंद्र जाधव, महेंद्र खाडे, गोरख मंगळे, प्रतिपाल भामरे, समीर पवार, योगेश मोरे, रमेश बैसाणे, किशोर काळे, सुकेशिनी खैरनार, उदय वाघ, विजय भामरे, आकाश सोनवणे, सुशिल शिंदे राजदीप वाघ, विशाल वाघ, स्वप्नील थोरात, किरण ढिवरे, आनंद कोकरे, गंगाराम निकम, राजेश निकुंभ, विनोद अहिरे, आनंद जगताप, अरुण ढिवरे, निखिल अहिरे, राजदीप आगळे, गौतम शिरसाठ, परशुराम खैरनार, रविंद्र देवरे, अमोल पवार, श्रीकांत वाघ, श्रीकांत तावडे, स्वप्नील अहिरे, यश पिसोळकर, किरण पवार, अनिता महिराळे, प्रतिक भामरे, डॉ. अनिल भामरे, सुदाम भामरे, रोहिदास करनकाळ, विशाल भामरे, भुषण भामरे, राकेश भामरे, आकाश भालेराव, दिपक बिऱ्हाडे, आकाश झाल्टे, गोटू वाघ, दिलीप वाघ, स्वप्नील भालेराव, प्रसाद सोनकांबळे, संदीप बोरसे, संजय पवार, प्रतिक गुलाले, अमित सोनवणे, आनंद सैंदाणे, अविनाश थोरात, भावेश ईशी, अविनाश थोरात, भुषण ईशी, नितीनकुमार भामरे, निलेश अहिरे, राहुल जगताप आदींनी रक्तदान केले. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी नरेंद्र गव्हाणे, सचिन बागुल, भुषण भामरे, कैलास बाविस्कर, श्रेयाली भामरे, योगेश बोरसे, विजय भामरे, नाना बागले, रत्नाकर बैसाणे, बुध्दभूषण भामरे, अमोल भालेराव, महेश भामरे, राकेश भामरे, नितीन भामरे आदींनी अथक परिश्रम घेतले.

# प्रा. मनिषा पाटील यांची शिक्षणशास्त्र पीएच.डी.

धुळे । प्रतिनिधी



धुळे बाजार समितीचे माजी सभापती श्री गुलाबराव रघुनाथ पाटील रा. अजंग यांच्या सुकन्या आणि सरस्वती माता शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन श्री बी.एम. पाटील बेहेड ता.साक्री यांच्या स्नुषा प्रा.सौ.मनिषा पाटील ह्यांनी शिक्षणशास्त्र या विषयात पीएच.डी.प्राप्त केली आहे. त्या मालेगाव सिव्हील हॉस्पीटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश पाटील यांच्या धर्मपत्नी आहेत. प्रा.सौ.मनिषा पाटील ह्यांनी माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना ऑनलाईन अध्यापनासाठी प्रशिक्षण कार्यक्रम विकसन आणि परिणामकारकता ह्या विषयावर पीएचडीसाठी प्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ.सज्जन थुल डॉ. कविता साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

मनिषा पाटील ह्या डी.बी. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मालेगाव कॅम्प येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या यशाबद्दल माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील,आ.कुणाल पाटील,प्राचार्य पी.पी.पाटील यांनी कौतुक केले आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# सरवड येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

## प्रत्येक नागरिकांनी आयुष्मान भारत कार्ड काढावेत





















धुळे । विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून आरोग्य विभागाच्यावतीने वंचित लाभार्थ्यांचे आयुष्मान भारत कार्ड काढण्यात येत आहे. या भारत संकल्प यात्रेत प्रत्येक नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढावीत असे आवाहन केंद्र शासनाचे समन्वयक डॉ. मिलिंद अंचाटे यांनी केले. धुळे तालुक्यातील सरवड येथे आयोजित कार्यक्रमांस सरवड गावच्या सरपंच रविता महेंद्र ठाकरे, उपसरपंच अलका जितेंद्र बोरसे, शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी भारती भामरे, डीडीसीसी बँकेचे विश्र्वास पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.तरन्नुम पटेल, अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. संजय मोरे, डॉ. सागर माळी, आरोग्य अधिकारी डॉ. शब्बीर पावरा, कृषी विभागाचे संजय देवरे, मुख्याध्यापक विकास पाटील, ग्रामपंचायत सदस्य विनोद बोरसे, प्रशांत गवळी, सावित्री बोरसे, ग्रामसेविका अर्चना कुवर आदी उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना डॉ.अंचाटे म्हणाले की, आरोग्य विभागाच्या आयुष्यमान भारत कार्डच्या आधारे प्रत्येक नागरिकाच्या कुटुंबास पाच लाख पर्यंत खाजगी तसेच सरकारी रुग्णालयात मोफत उपचाराचा लाभ घेता येतो यासाठी प्रत्येक नागरिकांनी हे कार्ड काढावे. यासोबत प्रत्येक नागरिकाने आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. नागरिकांनी टीबी, सिकलसेलची मोफत तपासणी करावी. तसेच कृषी विभागाकडील योजना तसेच नाबार्डच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती यात्रेच्या माध्यमातून दिली जात आहे त्याचा लाभ घ्यावा. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीची माती परीक्षण करून घेत आपल्या शेतातील लागवड व खत व्यवस्थापन करावे. यासोबत कृषी यांत्रिकीकरणात पुढील टप्प्यात ड्रोन तंत्रज्ञानाचे उपयोगिता पाहता त्याचे प्रात्यक्षिक कृषी विभागाकडून केले जात आहे याचाही लाभ शेतकऱ्यांनी घ्याव्या असे आवाहन केंद्र शासनाचे समन्वयक डॉ. अंचाटे यांनी केले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# धुळ्यात कर्नाटकचे मंत्री प्रियांक खर्गेंचा पुतळा जाळून निषेध

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविरोधात अवमानकारक वक्तव्य केल्याने भाजप आक्रमक













धुळे।
शहरातील काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र तथा कर्नाटकचे कॅबिनेट मंत्री प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविरोधात अवमानकारक वक्तव्य केल्याने भाजपा आक्रमक झाला आहे. राज्यभरात निषेधाचे सत्र सुरू झाले असून धुळे आणि साक्री येथेही भाजपाने निषेध आंदोलन केले. शहरातील महापालिकेच्या इमारतीसमोरच प्रियांक खर्गेंचा प्रतिकात्मक पुतळा जाळण्यात आला. आजचे आंदोलन खा. डॉ. सुभाष भामरे, महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजयुमो जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी यांच्या नेतृत्वात करण्यात आले. आंदोलनात धुळे लोकसभा मतदार संघाचे प्रमुख, मा.आ. राजवर्धन कदमबांडे, महापौर प्रतिभा चौधरी, चंदू सोनार, हिरामण गवळी, जयश्री अहिरराव, किरण कुलेवार, भारती माळी, वैशाली शिरसाठ, कल्याणी अंपळकर, जितेंद्र चौवटिया, ओमप्रकाश खंडेलवाल, संजय बोरसे, मुन्ना शितोळे, राजेंद्र खंडेलवाल, पृथ्वीराज पाटील, सुनिल कपिल, अमोल ढापसे. ॲड. किशोर जाधव, रवी मगरे, विनोद खेमणार, रितीक राजपूत, इकबाल पटेल, आकाश ढापसे उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ